जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३१/०५/२०२४
## दि.३०/०५/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे २२५/२०२४,भादविक ३०२,४९८(अ) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २६ वर्षे,रा.शिवणे पुणे |
| **आरोपीत** | पती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१९ ते दि.२९/०५/२०२४ रोजी दुपारी १२/४५ वा.चे सुमारास शिवराज पार्क बिल्डींग न्यू अहिरे गाव,गणपती माथा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण पुजा प्रविण चव्हाण वय २६ वर्षे रा.शिवराज पार्क बिल्डींग न्यू अहिरे गाव,गणपती माथा वारजे पुणे हि नमुद ठिकाणी राहत असताना यातील नमुद इसमानी बहिणीस घरगुती कारणा वरून तिचा मानसिक व शारीरीक छळ केला तसेच तीला मारहाण करुन तीचे अंगावर घरातील डीझेल टाकुन काडी लावुन पेटवुन जीवे ठार मारले आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी.मनोज शेडगे मो.नं.९८७०२०९९८० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६१७/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय ३२ वर्षे,रा.वाकड,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०५/२०२४ रोजी रात्री २३/३० वा चे सुमारास बोपदेव घाट येथील टेबल पॉइंट सोडून तिसऱ्या वळणावर,येवलेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांच्या मोटार सायकल वरून जात असतांना त्यांच्या समोर अचानक आलेल्या नमुद इसमांनी मारण्याची धमकी देवून त्यांच्याकडील मोटार सायकल,मोबाईल फोन व इतर मुद्देमाल बळजबरीने काढून घेवून पळून गेले.तसेच सदर इसमांनी फिर्यादी यांचे मालक यांना फोन करून सदर गाडी व मोबाईल फोनच्या बदल्यामध्ये १०,०००/- रूपये स्कॅनरवर ऑनलाईन ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन एकुण ४३,०००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जबरी चोरी करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.हसिना शेख मो.नं.९६८९०१९२७८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ४७८/२०२४,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक इसम,वय ३१ वर्षे,रा.आळंदी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०५/२०२४ रोजी सकाळी ११/०० वा.ते दि.२९/०५/२०२४ रोजी सकाळी ११/०० वा.चे.दरम्यान सर्वे नं.२०५,कपील मल्हार सोसायटीच्या पाठीमागे,बाणेर,पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या इमारतीच्या आवारामध्ये असलेल्या पत्र्याच्या दोन स्टोअर रुम मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ईलेक्ट्रीक कंपनीत इंजिनियर म्हणुन कामास असुन वर नमुद केले ता.वेळी कोणीतरी अज्ञात इसमाने सर्वे नं.२०५, कपील मल्हार सोसायटीच्या पाठीमागे,बाणेर,पुणे |

येथील बांधकाम चालु असलेल्या इमारतीच्या आवारामध्ये असलेल्या पत्र्याच्या दोन स्टोअर रुम मध्ये प्रवेश करुन सदर स्टोअर रुम मधील पावर सप्लाय केबल चे ५ बंडल व वायरींग हार्नेस व कनेक्टरचे २८८ नग असा एकुण २,८०,५३०/-रुपये किंमतीचे साहित्य फिर्यादी यांचे संमतीशिवाय,लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले आहे.

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.नरेंद्र पाटील मो.नं.९०११७१९१०० |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १२३/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ७२ वर्षे, रा.सेनादत्त पेठ,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/११/२०२२ रोजी पासुन ते आज पावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी कॉल करून फिर्यादी यांचे एनपीसीआय व इतर फाईलची रक्कम मिळवुन देतो असे अमिष दाखवुन फिर्यादी यांचे आयडीबीआय बँक, बँक ऑफ महाराष्ट्र व मनी ट्रान्सफर द्वारे तसेच फिर्यादी यांच्या पत्नी हिच्या बँक खात्या मध्ये एकुण रक्कम २५,६९,२९७/- रूपये भरण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अरूण घोडके मो.नं.९०११११५६६६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरुड पो स्टे १५२/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३५ वर्ष रा.कोथरूड डेपो,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०५/२०२४ रोजी पासुन ते आजपावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना यातील मोबाईल धारक यांनी फोन करुन चौबे व संदीप राव असे सांगुन ते टिळकनगर पोलीस ठाणे मुंबई येथुन व दुस-या मोबाईल वरुन सीबीआय मधुन बोलत असल्याचे भासवुन फिर्यादी यांचे नावाने एका मोबाईल क्रमांक रजिस्टर असल्याचे सांगुन व त्याद्वारे मनी लॉड्रींग केल्याच्या आरोपा वरून टिळकनगर पोलीस ठाणे मुंबई येथे एफ.आय.आर रजिस्टर असल्याचे खोटे सांगुन एक लिंक पाठवुन सुप्रीम कोर्टाची लिंक आहे असे सांगुन त्यावर कोर्टाच्या व सीबीआय च्या फिर्यादी यांना अटक करण्या विषयीच्या ऑर्डर्स खऱ्या असल्याचे भासवुन फिर्यादी यांच्या बँक खात्यातील रक्कम ही मनी लॉड्रींग मधील आहे का हे चेक करण्याचा बहाणा करून फिर्यादी यांचे बकँ खाते मधुन त्यांनी दिलेल्या एसबीआय खात्या मध्ये अनुक्रमे ६,००,०००/-रूपये व १४,००,०००/-रूपये असे एकुण २०,००,०००/- रूपये ट्रान्सफर करण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विक्रमसिंह कदम मो.नं.८०९७०४७८८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६१९/२०२४,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४८ वर्ष रा.उंड्री पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १५/०१/२०२४ रोजी ते आज पावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक याने स्टॉक ट्रेडिंग मध्ये नफा मिळवता येवु शकतो असे अमिष दाखवुन फिर्यादी यांना ऑनलाईन लिंक पाठवुन त्या व्दारे विविध अकाऊटं वर पैसे जमा करण्यास लावले तसेच KKRCA ॲप्लीकेशनवर फिर्यादीला भरघोस नफा मिळत असल्याचे भासवुन फिर्यादी यांना कोणताही परतावा न देता फिर्यादी यांची २२,०५,०००/- रुपयांची अर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) मानसींग पाटील, मो.नं ९९२२००८७६८ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८७५/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५८ वर्षे रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०३/२०२४ रोजी राहत्या घरी असताना ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद अनोळखी मोबाईल धारक यांनी त्यांचे नावाने मुंबई ते ईराण असे पाठविलेल्या पार्सलमध्ये अंमली पदार्थ आढळल्याने त्याबाबत मुंबई नार्कोटिक्स येथे केस दाखल केल्याची भिती दाखवुन त्यासंदर्भात चौकशी तसेच त्यामध्ये फिर्यादी यांना आरोपी करण्याची भिती दाखवुन चौकशी दरम्यान फिर्यादी यांचे कडून बँक खात्या वरुन एकुण ७,८५,६७७/- रुपये घेवुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) उमेश गित्ते मो.नं.९९२३१९३०८८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**